2018 - 19

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 SPECIAL ISSUE- 117

# Literature & Translation




**Guest Editor:**
Dr. B. S. Jagdale
Principal
MGV's Arts, Science & Commerce College,
Manmad, Dist. Nashik [M.S.] INDIA

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

**Executive Editor of the issue :**
Dr. P. G. Ambekar
Dr. V. T. Thorat
Dr. Shailaja Jaiswal
Prof. Mrs. Kavita Kakhandaki
Prof. J. P. Jondhale
Prof. M.M. Ahire
Dr. Mrs. Yogita Ghumare

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | अनुवाद : परिभाषा और प्रक्रिया | प्रा.राजाराम शेवाले | 111 |
| 32 | विज्ञापन और अनुवाद | डॉ. योगेश दाणे | 113 |
| 33 | हिंदी साहित्य में अन्य भाषाओं से अनुदित साहित्य | डॉ. शोभा राणे | 117 |
| 34 | संत कान्होपात्रा के अभंगो में विठ्ठल भक्ति | डॉ. नवनाथ गाडेकर | 120 |
| 35 | हिंदी साहित्य में अन्य भाषाओं से अनुदित साहित्य | डॉ. अनिता वेताल – अत्रे | 123 |
| 36 | किशोर शांताबाई काले की आत्मकथा छोरा कोल्हाटी का : दर्द का दस्तावेज | डॉ. विष्णू राठोड | 125 |
| 37 | अनुवाद की समस्याएँ एवं उपाय | डॉ. मिनल बर्वे | 128 |
| 38 | अनुवाद : अनुवाद प्रक्रिया और अनुवादक के गुण | प्रा.आर.एन. वाकले | 131 |
| 39 | भूमण्डलीकरण युग में अनुवाद की उपयोगिता | संतोष पगार, डॉ.अशोक धुलधुले | 134 |
| 40 | अनुवाद का क्षेत्र और हिंदी | डॉ. जालिंदर इंगले, प्रा. संदिप देवरे | 138 |
| 41 | अनुवाद की अन्य क्षेत्रों में उपलब्धियाँ | प्रा. आर. जे. बहोत | 142 |
| 42 | अनुवाद प्रक्रिया एवं सृजनशीलता | डॉ. जालिंदर इंगले, जयश्री गायकवाड | 145 |
| 43 | हिंदी साहित्य में अनुवाद परम्परा | डॉ. जिजाबराव पाटील | 148 |
| 44 | मराठी से हिंदी में अनूदित सामग्री का त्रुटीविश्लेषण | श्रीमती. प्रिया कदम | 151 |
| 45 | प्राचीन बाल कथा साहित्य के अनुवाद में जीवन मूल्य | सागर चौधरी | 154 |
| 46 | अनुवाद कि अवधारणा एवं उनका क्षेत्र | डॉ. इल्यास जेठवा | 157 |
| 47 | अनुवाद : स्वरूप एवं धारणा | उज्ज्वला अहिरे | 163 |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 48 | भाषांतर मीमांसा व विविध क्षेत्रीय भाषांतराचे स्वरूप | डॉ. सुधाकर शेलार | 166 |
| 49 | भाषांतर व अनुवाद : उगम, विकास आणि संधी | डॉ. राजेंद्र सांगळे | 172 |
| 50 | भाषांतरातील अडचणी आणि उपाययोजना | डॉ. मृणालिनी कामत | 176 |
| 51 | अनुवाद - भाषांतर - रुपांतर : संकल्पना आणि आवश्यकता | डॉ. विलास थोरात | 182 |
| 52 | शास्त्रीय साहित्याचे भाषांतर | डॉ. प्रमोद आंबेकर | 187 |
| 53 | अनुवाद संकल्पना व परंपरा | डॉ. भाऊसाहेब गमे | 191 |
| 54 | भाषांतर स्वरूप आणि संकल्पना | प्रा.ए.जी.नेरकर | 195 |
| 55 | भाषांतर : स्वरूप शोध | डॉ. आनंद वारके | 200 |
| 56 | भाषांतर स्वरूप आणि संकल्पना | प्रा. गजानन भामरे | 204 |
| 57 | अनुवाद- भाषांतर- रुपांतर : संज्ञा संकल्पना | डॉ. अरुण पाटील | 208 |
| 58 | भाषांतर संस्कृती | डॉ. स्नेहल मराठे | 211 |
| 59 | भाषांतराचे सांस्कृतिक सामाजिक योगदान | प्रा. विद्या बोरसे | 214 |
| 60 | भाषांतरातील सृजनशीलता | डॉ. आनंदा गांगुर्डे | 218 |
| 61 | साहित्य अकादमीचे अनुवादातील योगदान | डॉ. सुरेखा जाधव | 221 |
| 62 | भाषांतरातील सर्जनशीलता | प्रा. अनुराधा मोरे | 225 |
| 63 | भाषांतर : स्वरूप, प्रकार व कार्य | प्रा. युवराज भामरे | 230 |
| 64 | प्रसारमाध्यमे आणि भाषांतर | प्रा. भीमसेन आवटे | 236 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the pap on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can repub these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 117- Literature & Translation
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# भाषांतर संस्कृती

डॉ. स्नेहल संजय मराठे
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
म.स.गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प,
मालेगांव जि.नाशिक

**प्रास्ताविक :**

भारत हा बहुभाषिक देश आहे. भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळी भाषा बोलली जाते. प्राचीन काळापासून या भाषांची परंपरा चालत आलेली आहे. ही परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी भाषांतरीत साहित्य मोलाची भूमिका बजावत असते. कारण प्रत्येकाला सर्वच भाषांचे ज्ञान अवगत असते असे नाही.

एका भाषेतील ज्ञान, संशोधन दुसऱ्या भाषेत रूपांतरीत होऊन त्याचे महत्व जगाला कळावे यासाठी आजच्या युगात भाषांतरास महत्व प्राप्त झाले आहे. मराठी साहित्याच्या प्रारंभापासून मराठी भाषकांना भाषांतर, रूपांतर किंवा अनुवाद या साहित्यप्रक्रियेची ओळख आहे. महानुभावीय संत, पंत वाङ्मयातून भाषांतराची, रूपांतराची किंवा अनुवादाची पध्द्त रूढ होत आलेली दिसते. भाषांतर, रूपांतर, अनुवाद या संकल्पनांमध्ये सूक्ष्म परंतु महत्वपूर्ण भेद आहे. म्हणूनच या भाषांतरीत साहित्याला वाङ्मयीन क्षेत्रात एक वेगळे स्थान आहे. यात भाषेचा डौल, शब्दकळा आणि आशय यांची मूळची स्वाभाविकता अलगद टिकविण्याचा प्रयत्न असतो.

**भाषांतर, अनुवाद आणि रूपांतर :**

भाषांतर ही व्यक्तिनिष्ठ कला आहे. भाषांतराचे स्वरूप व व्याप्ती निश्चित करणेही कठीण आहे. एखादी साहित्यकृती एका विशिष्ट भाषेत जेव्हा निर्माण होते तेव्हा तिच्यात प्रत्यक्षपणे दिसत नसले तरी तिच्या आशयाशी वेगवेगळे विचारव्यूह संबंधित असतात. भाषांतर करताना भाषिक प्रश्न दोन भाषांच्या संदर्भातील व्याकरणिक प्रश्न लक्षात घ्यावे लागतात त्या भाषेचे सांस्कृतिक पर्यावरण, भाषेचा इतिहास, समूहाचे समाजशास्त्र इत्यादी साऱ्यांचे प्रतिबिंब त्या साहित्यकृतीतील आशयात पडत असते.

'अनुवाद' ही संकल्पना भाषांतर आणि रूपांतर यापेक्षा खूप व्यापक आहे. "अनुवाद म्हणजे मौखिक किंवा लिखित भाषेच्या माध्यमातून एकदा व्यक्त झालेल्या आशयाची, त्याच भाषेच्या किंवा दुसऱ्या एखाद्या भाषेच्या माध्यमातून पुन्हा केलेली मौखिक किंवा लिखित अभिव्यक्ती असते." अभ्यास संशोधनाचे एक व्यापक क्षेत्र म्हणून भाषांतर, अनुवाद आणि रूपांतर विकसित झाले आहे. 'अनुवाद' हा भाषांतर संकल्पनेसाठीच संस्कृतमध्ये वापरलेली पर्यायी संज्ञा आहे. केवळ भाषेमध्ये बदल करणे इतकेच येथे अपेक्षित नसून एखाद्या मूळ मजकुराचे स्पष्टीकरण करणे किंवा विश्लेषण करणे हे अनुवाद संकल्पनेत अपेक्षित असते. अनुवादामध्ये अनुवादकाची सर्जनशीलताही तितकीच महत्वाची असते. साहजिकच त्याला बहुविध भाषांचे किमान दोन भाषांचे तरी परिपूर्ण ज्ञान असावे लागते. दोन्ही भाषेतील पुरेसा शब्दसाठा असावा लागतो. तसेच दोन्ही भाषेतील व्याकरण व त्याचे नियम माहित असावे लागतात.

**भाषांतर संस्कृती :**

भाषांतरात किमान दोन भाषा व संस्कृती व यांचा मेळ साधला जातो. कारण या दोघांशी संबंधित ही कृती आहे इतिहासाच्या विविध टप्प्यांवरती निर्माण झालेल्या 'भाषांतर संस्कृती' त्यात समाजामध्ये,काही विशिष्ट सांस्कृतिक व राजकीय जबाबदाऱ्या आणि कार्ये पार पाडताना दिसतात.'भाषांतर संस्कृती' म्हणजे केवळ

भाषांतरित कृती असा अर्थ इथे अभिप्रेत नाही. भाषांतरामागच्या प्रेरणा कोणत्या, भाषांतरासाठी कोणते नियम, पध्दती वापरल्या आहेत, ज्या वाचकवर्गासाठी भाषांतरे करण्यात आली त्यांच्या गरजा कोणत्या, त्यांचे साहित्यव्यवहाराशी असलेले नाते, त्यांचे सांस्कृतिक व्यवहारात काय योगदान आहे व त्यांनी कोणती कार्ये केलेली आहेत यासर्व घटकांचा समावेश होतो.

भाषांतरित वाङ्मय त्या त्या समाजाच्या सांस्कृतिक व्यवहारात एक एकात्म व्यवस्था म्हणून कार्यरत असते. हे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीयदृष्ट्या वास्तव असू शकते. या दृष्टीने भाषांतरांचा अभ्यास केला तर त्या त्या समाजातील विविध व्यवहारांवर अनेक दृष्टीने प्रकाश टाकता येतो. त्याचा इतिहास अभ्यासता येतो. १९ शतकामध्ये; वसाहतवादी संस्कृती, साम्राज्यवादी संस्कृती व एकदेशीय संस्कृती यात संघर्ष चाललेला होता. हा संघर्ष राजकीयदृष्ट्या असंतुलीत विषम व असमान असलेल्या दोन भिन्न संस्कृतीमध्ये घडत होता. महाराष्ट्रात प्रचंड उलथापालथ झालेली होती. आपली संपूर्ण भाषांतर संस्कृती, याच काळात जन्माला आली व विकास पावली. ब्रिटीशपूर्व काळातल्या मराठी साहित्य परंपरेत गद्य भाषांतरित साहित्याची परंपरा नाही. अपवाद संत ज्ञानेश्वरांचा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला लिखीत साहित्य व्यवहाराच्या केंद्रस्थानी असलेली भाषांतर संस्कृती एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत संपूर्ण वाङ्मय व्यवहाराच्या कोपऱ्यात फेकली गेलेली दिसते. इंग्रजांनी भारतात आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर स्वार्थासाठी भारतीयांना शिक्षण देण्यास सुरूवात केली. परंतु हे शिक्षण जनसामान्यांना इंग्रजीतून देणे शक्य नव्हते. विलायती ज्ञान देण्यासाठी देशीभाषेशिवाय पर्याय नव्हता. त्यासाठी इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे करूनच देशीभाषांमध्ये पाठ्यपुस्तक निर्मिती करणे शक्य होते. असे ठरल्यानंतर भाषांतराला देखील पर्याय नव्हता. एकीकडे संस्कृत व इंग्रजी या उच्चवर्णीयांच्या भाषा मानलेल्या असल्याने त्यांची सांस्कृतिक अस्मिता जोपासली गेली तर दुसरीकडे भाषांतर कसे करावे आणि देशीभाषांचा विकास कशा प्रकारे करावा याचीही दिशा दाखविण्यात आली. अशा रीतीने या वेगवेगळया कारणांसाठी पण सोयीसाठी म्हणून भाषांतर व्यवहार अस्तित्वात आला.

इ.स. १८१८ ते १८५० दरम्यानच्या काळात युरोपियन ज्ञान जनसामान्यांपर्यात पोहचविण्यासाठी भाषांतरे केली गेली. त्यासाठी भाषांतरकाराला सरकार बक्षिसांचे प्रलोभन दाखवित होते. बहुतेक भाषांतरीत पुस्तके पाठ्यपुस्तके म्हणुन वापरण्यात येत होती. विविध विषयांवर ही पुस्तके होती. त्यात मॅकलेननचे शरीर विज्ञानाचे भाषांतर, बाळशास्त्री जांभेकरांची भूगोलाची भाषांतरे, हरी केशवजींचे भौतिक व रसायनशास्त्रांची भाषांतरे, छत्रे यांचे इसापच्या नीतीकथा व बाळमित्र व हरी केशवजींचे यांत्रिकक्रमण अशा विविध ज्ञान विज्ञान नीतिशिक्षणाच्या वाटा त्यात दिसतात.

पुढील भाषांतर संस्कृतीच्या कालखंडात म्हणजे इ.स. १८५० ते १८७५ या काळात भाषांतर कारांना शिक्षण क्षेत्रात फारसे महत्व दिसत नाही. सामाजिक शास्त्रे मनोरंजक माहितीप्रधान पुस्तके तयार झाली. अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास चरित्रे, नवेशोध, नीती, बोधशिक्षणासाठी उपयुक्त साहित्यिक कृतींचीही भाषांतरे दिसतात. या काळात दक्षिणा प्राईज कमिटी विशेष कार्यरत होती. इंग्रजी भाषेच्या वाढलेल्या वर्चस्वामुळे नव्या शैक्षणिक व्यवस्थेत मातृभाषेतून शिक्षण माध्यमिक व विद्यापीठीय स्तरावार अनावश्यक ठरले. याचा परिणम भाषांतरकारांच्या शैक्षणिक क्षेत्रातील पीछेहाटीत झाला. मात्र इ. १८७५ ते १९०० या कालखंडातील बहुतेक भाषांतरे ही रूपांतरेच होती. त्यात नाटके, कादंबऱ्या, चरित्र व इतिहासकथन हे वाङ्मयप्रकार अधिक लोकप्रिय झाले. अनेक भाषांतरे विद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या गरजा विचारात घेऊन झाली आहेत. इंग्रजीतून झालेल्या

भाषांतरापेक्षा संस्कृत मधून झालेल्या अनुवादाचे प्रमाण जवळपास दुप्पट आहे. शेक्सपिअर, गोल्डस्मिथची नाटके, सर वॉल्टर स्कॉट, रेनॉल्डस, मारी कॉरेली यांच्या कादंबऱ्या इ. आहेत. बहुतेक भाषांतरकार उच्चवर्णीय व मध्यवर्गीय ब्राह्मण आहेत. स्वतंत्र मराठी लिहिणाऱ्या लेखकांनी रचनांची, अनुभूतींची कथने लिहिल्यामुळे म्हणून मराठी साहित्य परिपक्व होण्याच्या दिशेने वाढू लागले.

समारोप :

प्रस्तुत निबंधात एकोणिसाव्या शतकातील भाषांतर संस्कृतीवर भाष्य केले आहे. महाराष्ट्राच्या १९ व्या शतकातील भाषांतर संस्कृतीचा विकास हा साम्राज्यवादी राजकारणाने, रणनीतीने केलेला दिसतो. आपले वर्चस्व भारतीयांनी स्विकारावे म्हणून ब्रिटीशांनी भाषांतराचा वापर प्रथम केला. या ब्रिटीशांपुढे नांगी टाकलेल्या काही अभिजनांनीही ब्रिटीशांची संस्कृती, मूल्ये येथे रूजविण्यासाठी भाषांतर कार्यात सहभाग घेतला. भाषिक व वाङ्मयीन निर्मिती व विकासासाठी इंग्रजी भाषा व साहित्य यांचे आदर्श निर्माण केले गेले. अभिव्यक्तीच्या नव्या वाटा, नवी क्षितीजे भाषांतर संस्कृतीने शेवटच्या टप्प्यात स्विकारलीच नाहीत तर उलट रंजनवादी भाषांतराचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे भाषिक विकासाच्या वाटाच बंद झाल्या असे दिसते. एकंदरीत एकोणिसाव्या शतकातील भाषांतर संस्कृती ही वासाहतिक व्यूहरचनेचे फळ आहे असे म्हणता येते.

संदर्भसूची :

१. आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी – कुलकर्णी गो. म.
२. भाषांतरमीमांसा – संपादन, डॉ. काळे कल्याण, डॉ. सोमण अंजली
३. भाषांतर विद्या, व्यावहारिक मराठी – संपादक : डॉ. स्नेहल तावरे
४. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार – पोतदार द.वा. कीनस प्रकाशन, पुणे
५. अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका – सरदार गं. बा.